प्रसिध्दी पत्रक　　　　　　　　दिनांक : २१/०८/२०२४

## लोकसेवक अविनाश भुरेवार, कंत्राटी ऑपरेटर मनरेगा, पंचायत समिती, किनवट यांनी ग्रामपंचायतीचे मनरेगा अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचे मस्टरवर पुढील कार्यवाही करण्यासाठी ३,५००/- रुपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो.स्टे किनवट जि.नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं २४६/२०२४ कलम ७ भ्र.प्र.अ. १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २१.०८.२०२४ रोजी ०२.०१ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | अविनाश विश्वनाथ भुरेवार, वय - ३२ वर्षे, ऑपरेटर (कंत्राटी) मनरेगा, पंचायत समिती, किनवट, ता. किनवट, जि. नांदेड रा. मांडवी ता. किनवट जि. नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,५००/- रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | ३,५००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी मौजे शिरपुर, ता. किनवट, जि. नांदेड येथील ग्रामपंचायत हद्दीतील मनरेगा अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचे एकुण ७ मस्टर पंचायत समिती किनवट येथे सादर केले. सदर मस्टरवर पुढील कार्यवाही करणेकरिता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येक मस्टरचे ५००/- रूपये याप्रमाणे एकुण ३५००/- रूपयांची मागणी मागणी केली. सदरची रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. तक्रारदार यांना सदरची लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी दिनांक १६/०८/२०२४ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.<br>नमुद तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडून लाच मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे ७ मस्टरचे पुढील कारवाई करणे करिता प्रत्येकी ५००/- रूपये याप्रमाणे ३५००/- रूपयाची पंचासमक्ष लाचेची मागणी केली.<br>त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक अविनाश विश्वनाथ भुरेवार यांनी तक्रारदार यांचेकडून पंचायत समिती कार्यालय, किनवट, ता. किनवट, जि. नांदेड येथे पंचासमक्ष लाचेची रक्कम ३५००/- रुपये स्विकारतांना लाचेच्या रकमेसह मिळून आले. नमुद आरोपी लोकसेवकास ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन किनवट, जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क क्रमांक :- 02462-253512<br>टोल फ्री क्रमांक- 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई-मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई-मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner